26 OCT 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षाविषयक माहिती खंडरूपात

## राज्यात पहिलाच प्रयोग : महाविद्यालयांचे कामकाज होणार सुटसुटीत

सकाळ विशेष



### अभिनव उपक्रम

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ''विद्यार्थी केंद्रित हा अभिनव उपक्रम आहे. परीक्षांचे नियोजनासाठी खंड उपयुक्त ठरेल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ एक ॲपसुद्धा उपलब्ध करत आहे. ज्यावर विद्यार्थ्याने त्याचा पीआरएन नंबर टाकल्यावर त्याला त्याच्या परीक्षेचे वेळापत्रक पाहता येईल.''**

संदीप खांडेकर :
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : अभ्यासक्रमाचे नाव, भाग, सेमिस्टर, विषयांचे कोडनिहाय नाव, परीक्षांच्या वेळा यांची एकत्रित माहिती खंडाच्या स्वरूपात उपलब्ध झाली, तर त्या विद्यापीठाचे कौतुक कोण करणार नाही? त्यामुळे महाराष्ट्रात असे एखादे विद्यापीठ आहे का, अशी विचारणा होणे साहजिक आहे. इतके चांगले पाऊल कोणत्या विद्यापीठाने उचलले? मुंबई की पुणे विद्यापीठाने, असा भुवया उंचावणारा प्रश्नही उपस्थित होऊ शकतो. विशेष हे, की असा खंड दुसऱ्या-तिसऱ्या विद्यापीठाने नव्हे तर शिवाजी विद्यापीठाने बनवला आहे. या पद्धतीचा खंड तयार करणारे शिवाजी विद्यापीठ महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांकरिता परीक्षाविषयक ही माहिती विद्यापीठाच्या वेबपोर्टलवर उपलब्ध केली आहे.

या खंडात ऑक्टोबर-२०१७ मधील परीक्षांच्या वेळापत्रकांचा समावेश आहे. चार ऑक्टोबर ते २९ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या पारंपरिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा अंतर्भाव आहे. खंड २९५ पानांचा आहे. महाविद्यालयांकरिता आवश्यक असलेली अभ्यासक्रमनिहाय, विषयनिहाय, सत्रनिहाय माहिती खंडात दिली आहे. त्याच्या आधारे महाविद्यालयातील संबंधित घटकांना परीक्षांचे नियोजन करणे सोपे होईल. विद्यापीठातील परीक्षा विभागाकडे सातत्याने विचारणा करावी लागणार नाही. ऑक्टोबर- २०१७ हिवाळी सत्रातील ५६८ परीक्षांच्या संकलित संपूर्ण वेळापत्रक दोन खंडांत प्रकाशित केले जात आहे. त्याच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन झाले असून त्याच्या सॉफ्ट कॉपी महाविद्यालयांत पाठविल्या आहेत.

परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात विद्यापीठाने केलेल्या सुधारणा महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. एकूण प्रश्नपत्रिकांपैकी ३३०० प्रश्नपत्रिका ऑनलाइन वितरणाचे काम परीक्षा विभागाने केले आहे. परीक्षा केंद्रनिहाय प्रश्न पत्रिकांची पाठवणूक, विकेंद्रित उत्तरपत्रिका तपासणी केंद्रे यामुळे परीक्षांचे नियोजन बिनचूक काटेकोर पद्धतीने केले जात आहे. दुसरा खंड लवकरच प्रकाशित केला जाणार आहे. सुमारे सहा हजार विविध विषयांच्या ५६८ सत्रांच्या परीक्षा विद्यापीठाकडून घेतल्या जातात.

### नॅक मूल्यांकनासाठी महत्त्वाचे

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे म्हणाले, ''नॅक मूल्यांकनाच्या दृष्टीने हे खंड महत्त्वाचे ठरणार आहेत. परीक्षांचे डॉक्युमेंटेशन खंडाच्या माध्यमातून आकाराला आले आहे. प्रत्येक प्राचार्यांच्या मेलवर परीक्षाविषयक माहिती पाठवली आहे.''

26 OCT 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभा निवडणूक; हालचाली गतिमान

## ४० अर्जांची विक्री; उमेदवारांची निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी शैक्षणिक क्षेत्रातील विविध संघटनांच्या हालचाली गतिमान झाल्या आहेत. या संघटनांकडून गटनिहाय उमेदवार निवडीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. उमेदवारी अर्ज विक्री-स्वीकृतीच्या प्रक्रियेतील तिसऱ्या दिवशी बुधवारी दिवसभरात ४० अर्जांची विक्री झाली.

या निवडणुकीच्या रिंगणात शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ हे



जोरदार तयारी करून उतरले आहेत. त्यापाठोपाठ आता शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. सर्वपक्षीय विद्यार्थी संघटनेने बुधवारी बैठक घेऊन चाचपणी केली आहे. या निवडणुकीसाठी गेल्या तीन दिवसांपासून उमेदवारी अर्ज विक्री आणि स्वीकृतीची प्रक्रिया सुरू झाली. याअंतर्गत बुधवारपर्यंत एकूण ४४० अर्जांची विक्री झाली आहे. मात्र, एकाही अर्जाची स्वीकृती झालेली नाही.

दरम्यान, निवडणूक लढविणाऱ्या संघटनांकडून गटनिहाय उमेदवार निवडीची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. एकत्रितपणे अर्ज दाखल करण्याचे नियोजनही काही संघटनांनी केले आहे. ज्या गटातील उमेदवारांची निवड पक्की झाली आहे, त्यांच्या अर्जासमवेत सादर करावयाची कागदपत्रे जमा करण्याची प्रक्रिया या संघटनांकडून सुरू आहे. अर्जविक्री आणि स्वीकृतीसाठी सहा दिवसांची मुदत उरली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 OCT 2017
पुढारी

# निवडणूक हालचाली गतिमान

## बैठका सुरू : इच्छुकांची उमेदवारीसाठी मनधरणी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणुकीसाठी हालचाली गतिमान झाल्या आहेत. विविध संघटनांनी बुधवारी बैठकांचे आयोजन केले. इच्छुकांनीही उमेदवारीसाठी मनधरणी सुरू केली आहे. त्यामुळे आजचा दिवस गतिमान हालचालींचा ठरला. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी सोमवारपासून अर्ज विक्रीला सुरुवात झाली.



नव्या कायद्यातील तरतुदीनुसार अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी, दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी निवडले जाणार आहेत. विद्यापरिषदेवर प्रत्येक विद्याशाखेतून दोन शिक्षक प्रतिनिधी, प्रत्येक अभ्यास मंडळासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड करण्यात येणार आहे. सध्या महाविद्यालयांना सुट्टी आहे. परंतु, निवडणुकीमुळे मात्र शैक्षणिक वर्तुळातील वातावरण तापले आहे. रिंगणात नेमके कोण असणार, हे अर्ज भरल्यानंतरच स्पष्ट होईल. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघारीची मुदत आहे. दरम्यान, 'सुटा'कडून सांगली व सातारा जिल्ह्यातील बहुतेक इच्छुक उमेदवारांचे अर्ज भरून घेण्याचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे.

26 OCT 2017


पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुरगूडमध्ये विद्यापीठांतर्गत कुस्ती स्पर्धेस प्रारंभ

## कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतून १८० पुरुष, ३० महिला मल्ल सहभागी





मुरगूड : शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेला प्रारंभ करताना मंडलिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. वीरेंद्र मंडलिक. सोबत संस्थेचे अध्यक्ष गजाननराव गंगापुरे, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, उपप्राचार्य शिवाजीराव होडगे, प्रा. डॉ. शिवाजी पोवार, सुखदेव येरूडकर, चंद्रकांत चव्हाण व अन्य. दुसऱ्या छायाचित्रात स्पर्धेतील एक क्षण. (फोटो : जे. के. फोटो, सुरुपली)

**मुरगूड / प्रतिनिधी :**
येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयामध्ये शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय कुस्ती स्पर्धांना प्रारंभ झाला. कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातून महिला व पुरुष मल्लांनी मोठा सहभाग नोंदवला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन मंडलिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष व मंडलिक साखर कारखान्याचे संचालक ॲड. वीरेंद्र मंडलिक यांच्या हस्ते झाले.

जय शिवराय एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष गजाननराव गंगापुरे अध्यक्षस्थानी होते. या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतून १८० पुरुष मल्ल व ३० महिला मल्ल सहभागी झाले होते. विविध वजन गटातून अजिंक्यपद पटकावण्यासाठी दिवसभरात रंगतदार लढती झाल्या. मंडलिक महाविद्यालय व साई कुस्ती केंद्र येथे या स्पर्धा झाल्या. यावेळी ॲड. मंडलिक म्हणाले, आपणाला कितीही व्याप असला तरीही चांगल्या आरोग्यासाठी शारीरिक सुदृढता महत्त्वाची आहे. व्यायामाचा मार्ग स्वीकारल्यास सक्षमतेबरोबरच निरोगी मन तयार होते. दिवंगत लोकनेते मंडलिक यांनी साई आखाड्याच्या माध्यमातून कुस्ती कला जोपासली.. मंडलिक महाविद्यालयानेही कुस्तीतून सातासमुद्रापार कीर्ती वाढवली आहे.

यावेळी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. शिवाजी पोवार यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या उज्ज्वल क्रीडा परंपरेची माहिती दिली. यावेळी भारतीय खेल प्राधिकरणचे साई राज्य समन्वयक चंद्रकांत चव्हाण, स्पर्धा निरीक्षक व निवड समिती चेअरमन संभाजी पाटील, प्रा. के. आर. गावडे, प्रा. बाजीराव पाटील, प्रा. दिलीप पवार, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, उपप्राचार्य डॉ. शिवाजी होडगे, माजी नगराध्यक्ष सुखदेव येरूडकर, पांडुरंग भाट, नामदेवराव मेंडके, उपनगराध्यक्ष जयसिंगराव भोसले, केशवकाका पाटील, नगरसेवक एस. व्ही. चौगले, किरण गवाणकर, बाजीराव गोधडे यांच्यासह कुस्तीशौकिन उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. पी. आर. फराकटे यांनी, तर आभार डॉ. अमृत मगदूम यांनी मानले.